फोन नं. (02164) 272414,
8275706613
Web : http://gcekarad.ac.in
Email: principal@gcekarad.ac.in,

सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन

# शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, कराड

विद्यानगर, कराड पिन - 415124 जि. सातारा

जा.क्रं.शाअमक/आधार-स्वंयमशिष्यवृत्ती/ 2026/2305    दिनांक :- 14 OCT 2026

## सूचना अत्यंत महत्वाची

**विषय** – इतर मागास वर्ग, विमुक्त जाती व भटक्या जमाती आणि विशेष मागारा प्रवर्गातील उच्च शिक्षण घेणा-या विदयार्थ्यासाठी शासकीय वसतिगृह योजना, ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले आधार व पंडीत दीनदयाळ उपाध्याय स्वंयम योजनेअंतर्गत व्यावसायीक वअव्यावसायीक विदयार्थ्याकरीता ऑफलाईन प्रवेश अर्ज करण्याकरीता वेळापत्रकात मुदतवाढ देणेबाबत.

**संदर्भ** – इतर मागास बहुजन कल्याण संचालनालय, पुणे यांचे पत्र २०२६/इमावबकसं/शावगृह/ज्ञानज्योती/आधार योजना/जा. क्र.५८३५ दि.१२/१०/२०२६.

उपरोक्त संदर्भीय विषयाच्या अनुषंगाने १२ वी नंतर व्यवसायीक व बिगर व्यवसायीक पदवी व पदवी नंतरचे पदव्युत्तर अभ्यासक्रमामध्ये महाविदयालयीन शिक्षण घेणारे व वसतिगृहापासून वंचित असलेल्या इतर मागास वर्ग, विमुक्त जाती व भटक्या जमाती आणि विशेष मागास वर्गातील विदयार्थी निवासी व शैक्षणीक सुविधापासून वंचित राहू नये यासाठी ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले आधार व पंडीत दीनदयाळ उपाध्याय स्वंयम योजना सुरु करण्यात आली आहे.

त्या अनुषंगाने संस्थेतील इतर मागास वर्ग, विमुक्त जाती व भटक्या जमाती आणि विशेष मागास समाजातील सर्व विदयार्थ्यांना सूचीत करणेत येते की, ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले आधार व पंडीत दीनदयाळ उपाध्याय स्वंयम योजना या योजनेचा लाभ घेण्याकरीता सन २०२६-२०२७ या शैक्षणीक वर्षात प्रवेश घेतलेल्या विदयार्थ्याना Online प्रवेश अर्ज भरण्याकरीता https://hmasnew.mahait.org या संकेतस्थळावर दि.१२/०८/२०२६ रोजीपासून (टॅब)उपलब्ध करुन देण्यात आला आहे. याची नोटीस संस्थेकडून प्रदर्शित करणेत आलेली आहे.

पंडीत दीनदयाळ उपाध्याय स्वंयम व ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले आधार योजनांची प्रवेश प्रक्रिया सुरळीतपणे राबविण्यासाठी दि. १०/१०/२०२६ पर्यंत ऑफलाईन पध्दतीने प्रवेश प्रक्रियेची मुदत देण्यात आली होती.

परंतु वरील संदर्भिय कार्यालयास राष्ट्रीय ओबीसी महासंघ यांच्याकडून मुदतवाढ देण्याबाबत पत्र प्राप्त झाले असून त्यानुसार शासकीय वसतिगृह, पंडीत दीनदयाळ उपाध्याय स्वंयम व ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले आधार योजनांची प्रवेश प्रक्रिया सुरळीतपणे राबविण्यासाठी दि. ३०/१०/२०२६ पर्यंत ऑफलाईन पध्दतीने प्रवेश प्रक्रियेस मुदतवाढ देण्यात आली आहे.

जे विदयार्थी वर नमूद केलेल्या विहीत मुदतीत अर्ज भरणार नाहीत त्यांना सदर योजनेचा लाभ न मिळाल्यास विदयार्थी स्वतः जबाबदार राहतील याची नोंद घ्यावी. याकरिता विदयार्थ्यानी दिलेल्या सूचनांचे काटेकोरपणे पालन करावे,जेणेकरुन ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले आधार व पंडीत दीनदयाळ उपाध्याय स्वंयम योजनेचा कोणताही पात्र विदयार्थी योजनेपासून वंचित राहणार नाही.

(डॉ.एस.जे.वाघ)
**प्राचार्य,**
**शासकीय अभियांत्रिकी महाविदयालय,कराड**

प्रत – १.सर्व सूचना फलकांवर लावणेसाठी.
२. संस्थेच्या संकेत स्थळावरती. (अपलोड करण्यासाठी)